● रविवार, दि. १६ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण आग; जीवितहानी नाही

**प्रयागराज -** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये गेल्या काही दिवसांपासून महाकुंभमेळा सुरु आहे. या कुंभमेळ्याला देशभरातून लाखो भाविकांनी सहभाग घेतला आहे. महाकुंभम ेळ्यात आतापर्यंत लाखो भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. मात्र, कुंभमेळ्यात आग लागल्याच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. आजही पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना सम ोर आली आहे. महाकुंभमेळ्यातील सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत.

महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागली. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत. ही आगीची घटना घडल्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, आतापर्यंत समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तसेच या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अद्याप आगीचं कारण समजू शकलेलं नाही. मात्र, ही आगीची घटना घडल्यामुळे भाविकांम ध्ये मोठी घबराट निर्माण झाली होती असंही सांगण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.


दरम्यान, बचाव आणि मदत कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) च्या टीम देखील घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. तसेच सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक भाविकांचे साहित्य जळून खाक झाले असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या आठवड्यातही महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ म ध्येही अशीच आग लागली होती. शंकराचार्य म ार्गावरील हरिहरानंद कॅम्पमधील २० हून अधिक तंबूंमध्ये आग पसरली होती. तेव्हाही अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं होतं.

महाकुंभमेळ्याच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागल्याची एक घटना घडली होती. शास्त्री पुलाजवळ सेक्टर १९ येथील गीता प्रेसच्या कॅम्पमध्ये आग पान २ वर

## महाराष्ट्र केसरीतील अंतिम लढतीची फेरतपासणी, ५ जणांची समिती

**पुणे -** अहिल्यानगर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत यंदा शिवराज राक्षे विरुद्ध पृथ्वीराज म ोहोळ यांच्यात अंतिम लढत झाली. मात्र, या लढतीत चितपट नियमान्वये पृथ्वीराज मोहोळला बाद देत पैलवान पृथ्वीराज मोहोळला विजयी घोषित करण्यात आले. पण, पंचाच्या या निर्णयावर आक्षेप घेत शिवराज राक्षेनं विचारणा केली, त्यावेळी राग अनावर झाल्याने त्याने थेट पंचाची कॉलर पकडून लाथ मारली. शिवराजचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर आणि माध्यमांमध्ये तुफान व्हायरल झाला. त्यामुळे, महाराष्ट्रभर महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेवर शंका उपस्थित करत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघावरही प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे, या संघटनेची व महाराष्ट्र केसरी कुस्ती परिषदेची देकील मोठी बदनामी झाले आहे. तर, काहींनी ही कुस्ती पुन्हा घेण्याची मागणीही केली होती. अखेर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धे तील अंतिम लढतीबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी २०२५ कुस्ती स्पर्धे तील अंतिम लढतीत पंचानी दिलेल्या निकालाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. कुस्ती क्षेत्राशी संबंधित ५ जणांची चौकशी समिती गठीत करण्यात आली असून विलास कथुरे यांना या समितीचे अध्यक्ष बनविण्यात आले आहे. तसेच, या समितीने २८ फ ेब्रुवारीपर्यंत शिवराज राक्षे आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यात रंगलेल्या अंतिम लढतीसंदर्भात अहवाल देण्याच्या सूचनाही महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेकडून करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, या कुस्तीचा अंतिम निकाल आता समितीचा अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल. दरम्यान, विलास कथुरे हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष आहेत.



उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ रोजी अहील्यानगर येथे ६७ वी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र केसरी खुल्या गटातील गादी विभागामध्ये अंतिम फेरीत पै.पृथ्वीराज मोहोळ विरुद्ध पै. शिवराज राक्षे ही कुस्ती झाली. या कुस्तीस मुख्य पंच म्हणुन छ. संभाजीनगर येथील आंतराष्ट्रीय पंच नितेश काचुलिया, मॅट चेअरमन म्हणून शासकीय पान २ वर

## सिडकोची बुधवारी सोडत

**नवी मुंबई :** सिडको महामंडळाने 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' या गृहनिर्माण योजनेची संगणकीय सोडत बुधवारी (ता.१९) म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी दुपारी दोन ते चार या वेळेत करण्याचे निश्चित केले आहे. शनिवारी ही सोडत होणार असे सिडकोने जाहीर केले होते. सिडकोने २६ हजार घरांच्या सोडतीसाठी शनिवार (ता.१५) निवडला होता. या सोडतीचे संदेश प्रत्येक अर्जदाराला त्यांच्या मोबाईलवर पान २ वर

## प्रत्येकाने आत्मचिंतन केलेच पाहिजे - राहुल महाराज जोशी

### हभप सोनवणे महाराज गुरुजी यांचे आज हरिकिर्तन

**जालना । प्रतिनिधी -** आत्मचिंतन हे प्रत्येकाने केलेच पाहिजे. आत्मचिंतन करणे सुध्दा चांगले कार्य आहे, असा हितोपदेश हभप राहुल महाराज जोशी यांनी येथे बोलतांना दिला. येथील सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प. पू. भगवान महाराज आनंदगडकर यांच्या कृपाशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा व विजय ग्रंथ पारायण सोहळ्यास उत्साही वातावरणात प्रारंभ झाला आहे. यावेळी आयोजित भागवत कथेचे व्दितीय पुष्प गुंफतांना राहुल म. जोशी हे बोलत होते. दरम्यान, उद्या रविवारी हभप सोनवणे महाराज गुरुजी यांचे हरिकिर्तन होणार आहे.

पुढे बोलतांना जोशी महाराज म्हणाले की, एका अंशी वर्षाच्या वृध्दाने आपल्यापुढे आणून डायर्या ठेवल्या. त्या डायर्यांमध्ये काय होते तर त्यांची दिनचर्या होती, कोणतेही पोथी, पुराण नव्हते. आपल्या पैकी किती जण दिनचर्या लिहीतात? असा प्रश्न करुन त्यांनी आजच्या कथेदरम्यान, कौरव, पांडव आणि द्रोपदी, देवी भागवत आणि महादेवचाही उल्लेख केला. त्यांनी यावेळी विविध भजनं आपल्या कथेदरम्यान गायिली.दरम्यान, किर्तन सेवेत हभप भगवान महाराज सावंत यांनी घेईल मी जन्म । याच साठी देवा।। तुझि चरण सेवा साधावया ।। या संत तुकाराम म हाराजांच्या ओवीवर सुंदर असे निरुपन केले. ते म्हणाले की, संत विचारांची ही फलश्रुती आहे की, ऐकणार्यांच्या मनात चांगले विचार येतात. वाईट नाही. लोखंडाला परिस लागला की त्याचे सोने होते. पेढा कसाही असला तरी तो गोडच लागतो. तसेच संत विचाराचेही आहे. या ठिकाणी मनुष्याला चांगले विचार- आचार मिळतात, असेही त्यांनी यावेळी विस्तृतपणे सांगितले.

या सप्ताहात उद्या सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी राजेद्र महाराज वाघमारे आणि मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी हभप श्रीहरी रसाळ महाराज तर बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी हभप प्रा. उध्दव महाराज राऊत (आळंदी), गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी हभप त्रिंबक महाराज दस्तापुरकर यांचे हरिकिर्तन होणार असून शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तर याच दिवशी तत्पूर्वी श्री. गजानन महाराज पालखी मिरवणूक (दिंडी) सोहळा होणार आहे. यानिमित्त भरगच्च धार्मिक कार्यक्रम होणार असून दररोज सकाळी काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, श्री. गजानन विजय ग्रंथ पारायण, त्यानंतर गाथा भजन तर दुपारी




१ ते ५ यावेळेत श्री. भागवत कथा होणार आहे. तर सायंकाळी हरिपाठ व रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन व त्यानंतर हरीजागर होणार आहे. तत्पूर्वी भागवत पुजन व समाप्ती महाआरती सौ. व श्री. सिमा शामराव भांदरगे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रगट दिनाचा महाप्रसादाचे मुख्य यजमान सौ. व श्री. सरिता दत्तात्रय शेजुळ हे राहणार असून भजनी मंडळ पान २ वर

युवा आदर्श

सरला ...

व्हॅलेंटाईन डे आला
फुल बाजार फुलला
मस्त भाव गुलाबाला
बाजार सारा झुलला
रे घाम गाळ गाळला
दोनपैसे बळीराजाला
दलाल सुखात न्हाला
दहापैसे व्यापाऱ्याला
होटेल बार गुत्तेवाला
उधाण ये उत्साहाला
मॉल दुकाने सजलेली
तयार सर्व उत्सवाला
भेट वस्तुंची रेलचेल
काय घेऊ प्रश्न मला
ऑनलाईन खरेदीचा
मार्ग भला असे खुला
उखळ पांढरे सर्वांचे
प्रेमामुळे धंदा झाला
तिजोरीत पैसा आला
सुखानंदा झुले झुला
प्रेमाचा गोड उमाळा
उत्साहाने करा कल्ला
लक्ष्मण रेषा सांभाळा
अनाहूत जाणं सल्ला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालना जिल्ह्यातील खेळाडूंची इंडिया यूथ आय लीगसाठी निवड

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील आर.आर.सी आणि मेमन लॉजिस्टिक्स अक्ॅडमी मधील तीन खेळाडूंची ऑल इंडिया फ ुटबॉल फेडरेशन इंडिया यूथ आय लीग साठी निवड झाली आहे. तेरा वर्षे वयोगटातील अबुझर आसेफ बेग आणि पंधरा वर्षे वयोगटातील शेख अब्दुल मलिक ज़मीर व रय्यान शेख जावेद यांनी आपली चमकदार कामगिरी सादर करत स्पोर्ट्स मेनिया, पुणे येथे स्थान मिळवले.

या खेळाडूंना प्रशिक्षक शेख रियाझ युसुफ सर आणि अब्दुल रौफ खानयांचे मार्गदर्शन मिळाले. तसेच स्पोर्ट्स मेनिया अक्ॅडम ीचे प्रशिक्षक परेश सर (एक्स इंटरनॅशनल प्लेयर), कुणाल सावंत (संतोष ट्रॉफी हेड कोच), लुकस वाघमारे, पान २ वर



## संत सेवालाल यांचे विचार दीपस्तंभसमान

**मंठा । प्रतिनिधी -** जि.प.प्रा.शा. हिवरखेडा येथे शनिवार (दि १५) संतश्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शा.व्य.स चे अध्यक्ष श्री.चव्हाण अंकुश हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच श्री.विठ्ठल राठोड, कृ.उ.बा संचालक बाबाराव राठोड, नारायण राठोड, हरदास राठोड, भारत मोरे, आसाराम चव्हाण, राम चव्हाण हे होते.




या प्रसंगी फुले-आंबेडकरी अभ्यास समूहाचे प्रचारक तथा शिक्षक संदीप इंगोले आपले मनोगत व्यक्त करताना संत सेवालाल महाराज यांचे विचार दीपस्तंभ कसे आहेत हे पटवून सांगताना म्हणाले की ,या म हापुरुषाने आजन्म अविवाहित राहून पान २ वर

## डिजिटल मिडिया धोरण जाहीर व्हावे - राजा माने



**मुंबई -** राजस्थान सरकारप्रम ाणेच महाराष्ट्र सरकारनेही डिजिटल मिडिया धोरण लागू करावे, यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू असल्याची माहिती डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजा माने यांनी दिली. मुंबईच्या मालाड येथील राजोरा बँक्वेट हॉल येथे राजा मानसाहेबांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई शहर व उपनगरातील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत मार्गदर्शन करताना माने यांनी संघटनेचा इतिहास, राज्यभर वाढलेली व्याप्ती, पत्रकारांच्या कुटुंबियांसाठी सुरू करण्यात आलेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानची माहिती दिली. तसेच, संघटनेच्या ६ एप्रिल रोजी होणाऱ्या अधिवेशनासह संघटनेची पुढील दिशा सांगितली.

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या मुंबई विभागाचे अध्यक्ष संजय भैरे यांच्या नेतृत्वात मुंबईत कार्यरत असलेल्या डिजीटल मिडिया पत्रकार व संपादकांच्यावतीने राजा माने यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी, अनेक मान्यवर व स्थानिक पत्रकार उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना, माने यांनी डिजिटल मि डिया धोरण व प्रतिबिंब प्रतिष्ठानबद्दल माहिती दिली. आपल्या संघटनेचा पत्रकार कुटुंबवत्सल असला पाहिजे, उद्योगी (व्यवसायिक) असला पाहिजे, पण खंडणीखोर अजिबात असता कामा नये. कारण, संघटनेच्या माध्यम ातून डिजिटल मीडियातील पत्रकारांना आता कुठे प्रतिष्ठा मिळत आहे, समाजमान्यता मिळत आहे, शासन मान्यताही लवकरच मिळेल. त्यासाठी, संघटनेचे सर्व पदाधिकारी जोमाने तालुका ते मंत्रालय स्तरावर धडक देत आहेत. संघटनेचा अध्यक्ष मी असलो तरी संघटनेचं काम हे आपण, आम्ही म्हणूनच पुढे जात आहे. संघटनेचा पान २ वर

# संपादकीय

## निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रक्तदान ही जनसमान्याची सेवा - उदयसिंह बोराडे

## संत सेवालाल छत्रपती शिवाजी महाराज जयंती अनुषंगाने १२६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**मंठा । प्रतिनिधी -** रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असे म्हटले जाते रक्तदान करून आपण एक नवे अनेकांचे प्राण वाचून जीवनदान देऊ शकतो. रक्तदानामधील गैरसमज दूर करून अनेकांनी पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. जगामध्ये रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान समजले जाते रक्तदानाचे फायदे आणि गरज लक्षात घेऊन सर्वांनी समोर येऊन रक्तदान केले पाहिजे त्या अनुषंगाने.शिवसेना युवा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी पुढे येऊन शिवसेना कार्यालय बाजार समिती येथे संत सेवालाल महाराज जयंती आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दि.१५ फेब्रुवारी रोजी संजीवनी ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले या शिबिरामध्ये १२६ रक्तदात्यांनी रक्तदान करून योगदान दिले. या देश सेवेसाठी आपल्या माणसासाठी काहीतरी देणे आहोत ही प्रचिती रक्तदान करून दाखवली. यावेळी उपस्थित शिवसेना नेते बाजार समिती मा सभापती प्रल्हादराव बोराडे, संचालक संतोषराव वरकड, नगराध्यक्ष वैजनाथ नाना बोराडे, माजी नगराध्यक्ष बालासाहेब बोराडे, उपनगराध्यक्ष जमीर कुरेशी, पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे, संचालक दत्तात्रय काकडे, वसंत तात्या जाधव, नगरसेवक अचित नाना बोराडे, नगरसेवक प्रसाद काका बोराडे, नगरसेवक दीपकराव बोराडे, नगरसेवक भाईजी बागवान, नगरसेवक राजेभाऊ खंदारे, पप्पूजी दायमा, दिगंबर बोराडे,पत्रकार राजेभाऊ भुतेकर, संतोष पवार, पत्रकार बाबूजी तिवारी, दलित आघाडी तालुका प्रमुख दिलीपराव हिवाळे, दलित आघाडी उपजिल्हाप्रमुख नितीन मोरे, उप तालुका प्रमुख विलास राठोड, युवा उपतालुकाप्रमुख विजय चव्हाण, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख चांद भाई



पठाण, युवा सेना तालुकाप्रमुख दीपक गायकवाड, उप तालुका प्रमुख भीमराव वाघ, उपतालुकाप्रमुख बाळासाहेब देशमुख, उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, सतीश देशमुख, युवा सेना शहर प्रमुख राजेश खरात, हलीम भाई कुरेशी, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, उपशहर प्रमुख अमोल विरकर, सतीशराव वायाळ, महेश देशमुख, शुभम शेंडगे, विनोद खरात, पवन खरात, हर्षद पवार, उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराज यांची शिकवण सर्वांनी आत्मसात करावी - अ‍ॅड विकास पिसुरे

**जालना । प्रतिनिधी -** संत सेवालाल महाराज जयंती निमित्त अँड. संजु राठोड यांच्या कार्यालयात जेष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. उत्तम राठोड, अ‍ॅड. पी.डब्ल्यु कुलकर्णी, मोहन राठोड, उध्दव पवार, एम.पी. चव्हाण, अ‍ॅड. एम.डी. चव्हाण, कदिर बागवान, अ‍ॅड. अर्शद बागवान, अ‍ॅड. महेंद्र साळवे, अ‍ॅड स्वप्नील खरावे, अ‍ॅड महेश धन्नावत, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड विकास पिसुरे इत्यादी च्या उपस्थितीत साजरा करण्यात आली. यावेळी वकील संघाचे अध्यक्ष अँड. विकास पिसुरे यांनी सांगितले की, सर्वांनी संत सेवालाल महाराज यांची शिकवण आत्मसात करुन त्याप्रमाणे वागावे. अँड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, तेलंगणा शासन जयंती



साजरी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाला कमीत-कमी १ कोटी चा निधी देत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने सुध्दा निधी सर्व जिल्हयांना द्यावा. पर्यावरण रक्षण, लोकांची सेवा, स्वतःच्या कुटूंबा प्रमाणे करणे व जाती-पंथाचे भेदभाव कधीही करु नये. तथा निसर्गा सोबत रहावे याबद्दल संत सेवालाल महाराज यांनी शिकवण दिलेली आहे. त्यामुळे त्यांचे विचार सर्व सामान्या पर्यत पोहचवणे गरजेचे आहे.

# ...तर उद्धव ठाकरेंना हा देश सोडून जावं लागेल, रामदास कदम

**रत्नागिरी -** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शनिवार (दि १५ फेब्रुवारी) रत्नागिरीत जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना शिवसेनेचे (शिंदे) नेते रामदास कदम यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. 'जर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले नसते तर शिवसेना कधीही फुटली नसती', असा दावाही रामदास कदम यांनी सभेत बोलताना केला. तसेच 'आम्ही जर तोंड उघडलं ना तर उद्धव ठाकरेंना हा देश सोडून जावं लागेल', असा हल्लाबोल रामदास कदम यांनी केला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पायदळी तुडवण्याचं काम उद्धव ठाकरे यांनी केलं. शिवसेना प्रमुखांच्या पाठित खंजीर खुपसण्याचं काम उद्धव ठाकरेंनी केलं. मला सांगा शिवसेना प्रमुख मुख्यमंत्री होऊ शकले नसते का? पण त्यांनी नारायण राणे, मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री केलं. माझ्या सारख्या सर्वसामान्य माणसालाही त्यांनी नेता केलं. मात्र, जे शिवसेना प्रमुखांनी कमवलं होतं ते सर्व उद्धव ठाकरे यांनी गमावलं. उद्धव ठाकरे जर मुख्यमंत्री झाले नसते तर शिवसेना देखील फुटली नसती. मी हे जबाबदारीने बोलत आहे, असं रामदास कदम यांनी म्हटले.

# भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ उत्साहात

आयोजक गणेश साहू आणि शीबा शेख यांच्या नेतृत्वाखाली शीबा मीडिया वर्कशॉपने हा कार्यक्रम आयोजित केला होता. दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खानसह अनेक प्रसिद्ध व्यक्तींना सन्मानित करण्यात आले मुंबई भारतासारख्या विविध आणि उत्साही देशात, असे असंख्य व्यक्ती आहेत जे त्यांच्या जीवनात विविधता आणण्यासाठी पुरेसे प्रयत्न करतात.

मतप्रसारकांपासून ते कलाकारांपर्यंत, हे व्यक्ती आपल्या समाजाच्या वर्गाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या प्रशंसनीय योगदानाची दखल घेत, भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ ८ फेब्रुवारी २०२५ रोजी अंधेरी पश्चिम, मुंबई येथे शीबा मीडिया वर्कशॉपद्वारे आयोजित केले जाईल. या कार्यक्रमाचे नेतृत्व आयोजक गणेश साहू आणि शीबा शेख करत आहेत. भारतातील जीवन स्वातंत्र्य साजरे करणे आणि निःस्वार्थपणे त्यांच्या समुदायाची सेवा करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या लोकांचा सन्मान करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या अढळ भावनेला आणि दानशूरपणाला हा पुरस्कार सोहळा मान्यता देतो.

प्रतिष्ठित प्रमुख पाहुणे - दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान, हारून खान (शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे वर्षातील सर्वात पात्र आमदार) अँड्रीज डू प्रीझ (मॉडेल; आंतरराष्ट्रीय शो दिग्दर्शक आणि सेलिब्रिटी), सिंडी नाओमी कीट संस्थापक एमडब्ल्यूआय इंटरनॅशनल, सोन्जा ॲडोनिस ३५ ब्युटी क्वीन इंटरनॅशनल अतिथी बी.एन. तिवारी- अध्यक्ष एफडब्ल्यूआयसीई, विजय शाह भाजप वर्सोवा विधानसभा, साजिद पटेल, भीमराज जहांगीर, एजाज खान (अभिनेता, दिग्दर्शक), अरविंद कुमार वाघेला (सर्वोत्तम अभिनेता (सुपरस्टार राजस्थान फिल्म इंडस्ट्री), सौरभ शर्मा (एमडी-सौरभ एंटरटेनमेंट), पल्लवी शर्मा (सीईओ-सौरभ एंटरटेनमेंट), हाजी सैफ शेख (व्हीपी - मनसे कायदेशीर निर्माता), राजेंद्रसिंह राठोड (चित्रपट निर्माता - राजभा फिल्म्स), वकार शेख - (झी५ चित्रपट सायलेन्स-२ मधील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार विजेते), सुनील पाल (कॉमेडियन आणि अभिनेता) ईशान मसीह अभिनेता, डान्सर (फेम- बिग बॉस), जैनब पात्रा (अभिनेत्री प्रभावशाली), जानमन (रॅपर/गाणे लेखक), जीतू गुप्ता (प्रसिद्धी- भाभी जी घर पे है), अरमान अहमद (प्लेबॅक सुफी गायिका), क्वीन बरखा आहुजा (बहुमुखी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय गायिका आणि रॅपर), नवाज साजिद पटेल (प्रभावशाली आणि युट्यूबर), शहनाज अहमद अली खान (सामाजिक कार्य, शहनाज प्लांट नर्सरीचे मालक), गजानन प्रभाकर चारी (पोलिस हेड कॉन्स्टेबल टुरिस्ट पोलिस युनिट्स गोवा पोलिस), पूजा पांडे (अभिनेत्री आणि मॉडेल), राजा अली अभिनेत्री प्रीती सिंग (बॉलिवूड अभिनेत्री), रजनी मेहता (बॉलिवूड अभिनेत्री), रमेश गुजराल (पॅरा/ब्लॅक कॅट कमांडो आणि अभिनेता), या लोकांनी त्यांच्या क्षेत्रात केवळ उत्कृष्ट कामगिरी केली नाही तर सकारात्मक बदल घडवून आणला आहे आणि कलाकारांनाही असेच करण्यास प्रेरित करण्यासाठी त्यांच्या व्यासपीठाचा वापर केला आहे. भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ चे उद्घाटन सिमरन आहुजा (सेलिब्रिटी अँकर, मिस इंडिया, अभिनेत्री, टीव्ही टॉक शो होस्ट, ग्लोबल एम्सी, लोकनृत्याची राणी) यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाने या अज्ञात नायकांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या उल्लेखनीय स्मारके आणि योगदानाचे चित्रण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम केले. यासोबतच, रंगा रंग कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले होते ज्यात जानेमन आणि त्यांच्या टीमने उत्कृष्ट कलाकार सादर केले आणि अरमान अहमदने देखील अतिशय सुंदर लाईव्ह सादरीकरणे सादर केली, विजय देबनाथ डान्स गुरूच्या टीमनेही धमाल केली.. लोकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात, टीमने इतर कलाकारांपेक्षा एकाला चांगले सादर केले ज्यामुळे भारतीय अमृत महोत्सव पुरस्कार २०२५ च्या वैभवात भर पडली.

पान १ वरुन

### महाकुंभमेळ्यात ...

लागली होती. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या होत्या. दरम्यान, त्या आधी महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येच्या दरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली होती. त्या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाल्याचीही घटना घडली होती.

### महाराष्ट्र केसरीतील ...

कोच पै. दत्तात्रय माने व साईड पंच म्हणून विवेक नाईक यांची नेमणुक करण्यात आली होती. सदर कुस्तीच्या निकालवरुन बराच गदरीळ झाला, स्पर्धा संपल्यानंतर जनमानसात सुध्दा निकालावरून नाराजी व्यक्त होताना दिसली.

सदर निकालाच्या विरुध्द पै. शिवराज राक्षे यांनी आजपर्यंत कोणतीच लेखी हरकत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडे नोंदवली नाही. परंतु समाजात सदर निकालाबाबत होत असलेल्या उलट सुलट चर्चेचा विचार करता महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने याबाबत ५ जणांची चौकशी समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या चौकशीच्या प्रमुखपदी आपली नेमणूक करण्यात येत आहे, असे पत्र कुस्तीगीर संघाने विलास कथुरे यांना लिहिले आहे. तसेच, आपल्यासोबत प्रा. दिनेश गुंड पुणे, सुनिल देशमुख जळगाव, नामदेव वडरे सांगली, आणि विशाल वलकवडे नाशिक यांची नियुक्ती करण्यात येत आहे, असेही म्हटले आहे. सदर कुस्तीच्या निर्णयाबाबत आपण सखोल चौकशी करून आपला अहवाल महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संधास २८ फेबुवारी २०२५ च्या अगोदर सादर करावा, असेही या पत्रातून सूचविण्यात आले आहे.

### सिडकोची बुधवारी ...

पाठविले होते. मात्र शनिवारी मध्यरात्री सिडकोने सर्व अर्जदारांना ऑनलाईन मेसेज पाठवून सोडतीची तारीख पुढे ढकलल्याची माहिती दिली. दोन दिवसांपूर्वी ही सोडत यशस्वी करण्यासाठी रंगीत तालिम सुद्धा सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल यांच्या उपस्थितीत तळोजा येथे घेण्यात आली. सोडतीची पूर्वतयारी झाली असताना सुद्धा अचानक सोडत पुढे ढकलल्यामुळे अर्जदार आश्चर्य व्यक्त करत होते. मागील वर्षी (१२ ऑक्टोबर) दस-याच्या मुहूर्तावर सिडकोने २६ हजार घरांसाठीची सोडत प्रक्रियेला सुरूवात केली. तब्बल १ लाख ६० हजार नागरीकांनी या योजनेसाठी अर्ज भरले.

संकेतस्थळावर कागदपत्रांची जमवाजमव केल्यानंतर घरांच्या किंमती जाहीर करण्यासाठी सिडकोने दोन महिन्यांचा काळ लावला. त्यानंतर २५ लाख ते १ कोटी ५ लाखांपर्यंतच्या घरांच्या किमती जाहीर केल्याने आर्थिक दुर्बल घटक आणि अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांना या किमती परवडणा-या नसल्याने १ लाख नागरिकांनी अर्जाचे शुल्क भरणे पसंत केले नाही. उरलेल्या ६० हजार अर्जदारांपैकी अवघ्या २१ हजार ५०० अर्जदारांनीच अर्ज शुल्कासह अनामत रक्कम भरली. तब्बल १ लाख ३८ हजार ५०० अर्जदारांनी या सोडतीला पाठ दाखविली. सोडत प्रक्रियेसाठी तब्बल चार महिन्यांचा काळ लागल्यामुळे सिडकोच्या कारभाराविषयी अर्जदारांची समाजमाध्यांवर संताप व्यक्त केला. अखेर सिडकोने शिवजयंतीच्या दिवशी बुधवारी (ता.१९) सोडतीची तारीख निश्चित केली असली तरी सोडत तळोजा वसाहतीमधील फेज १, येथील सेक्टर २८ येथील रायगड इस्टेट येथे होईल की सिडको भवनातील सभागृहात हे अद्याप जाहीर केलेले नाही. मात्र बुधवारी सोडतीचे थेट प्रेक्षपण तळोजा (खारघर पूर्व) सेक्टर ३७ भूखंड क्रमांक १४ आणि खांदेश्वर येथील सेक्टर २८, भूखंड क्रमांक एक (खांदेश्वर रेल्वेस्थानक लगत) तसेच खारघर सेक्टर १५ भूखंड क्रमांक ६३ अ येथील अनुभव केंद्रांवर अर्जदारांना पाहता येईल.

### प्रत्येकाने आत्मचिंतन ...

आणि किर्तन सेवेस साथ देणार आहेत मृदंगाचार्य हभप भगवान म. जाधव व तुकाराम म. मुढे, गायनाचार्य हभप हभप विष्णू म. सावंत हे ज्ञानेश्वर म. जोशी, भगवान म. लकडे, गिरी महाराज, रमेश प. पवार, यादव म. जाधव, उध्दव म. राठोड तर हरिपाठाचे नेतृत्व हभप विष्णू म. सावंत हे करणार आहे. तर श्री गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण व्यासपीठ प्रमुख म्हणून हभप आत्माराम महाराज बिडवे हे काम पाहत आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. गजानन महाराज विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. सपंतराव पाटील व समस्त विश्वस्तांनी केले आहे.

### जालना जिल्ह्यातील ...

शुभम पासलकर आणि निखिल कदम (आयएसएल प्लेअर)यांनी त्यांच्या खेळाची दखल घेत निवड केली.

आर.आर.सी फुटबॉल अॅकॅडमीचे शेख जावेद, मेमन लॉजिस्टिक्सचे अजमल व आकीब पडेला, तसेच किशोर जाधव, रोहन वाघमारे, रफिक शेख यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### संत सेवालाल ...

मानवतेच्या कल्याणाचा विचार आणि मार्ग दाखविला. त्यांनी सोप्या उदाहरणातून अहिंसक मार्ग दाखवला त्यांनी कोणताही मठ स्थापन केला नाही. शिष्य बनविण्यासाठी कानफुकीचा धंदा केला नाही.कधीही मंत्रतंत्र,जपजाप्य,व्रत वैकल्ये उपवास,अनुष्ठान याचा पुरस्कार केला नाही.या विपरित त्यांनी देवाधर्मात पूजनात वेळ घालवू नका.सत्कर्माचा विचार करा.

(कोई केनी भजो मत,कोई केनी पुजो मत..भजनेम वेळ घालणे पेक्षा करणी करेर शिको.. मार शिकवाडी पर ध्यान दिजो) प्रेमाने माणस जिंका.आपसातील भेद दूर करा.सर्व मानव समान आहेत.त्यांच्या हयातीत त्यांनी आदर्श समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला.गोर समाजात सतीप्रथा नव्हती. विधवा विवाहास मान्यता होती.

संत सेवालाल चमत्कारी संत नव्हते तर ते दार्शनिक व दृष्टे होते. भविष्यात काय काय घटना घडणार असतील, त्याचा त्यांना वर्तमान परिस्थितीच्या बदलावरून अंदाज येत होता. समाजाला दहा वचने सांगितली.त्याद्वारे भविष्याचा अंदाज सांगितला.संत श्री सेवालाल महाराज यांनी समाधी घेतल्यानंतर समाजाने त्यांना देवपण बहाल केले.या देवपणा भोवती कालांतराने निष्ठेची वलये तयार झाली आणि सेवालाल महाराजांमधील एक सहृदयी माणूस गहाळ झाला.

या कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री मनोहर वीरकर यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सह शिक्षक श्री.सचिन नलावडे आणि सह शिक्षिका श्रीमती रेणुका दुभळकर यांनी परिश्रम घेतले.

### डिजीटल मिडीया ...

प्रत्येक घटक इथे महत्त्वाचा आहे. त्याच माध्यमातून, डिजिटल मिडिया धोरण राबवण्यासाठी आपण पाठपुरावा करत असल्याचे मानेसाहेबांनी सांगितले.

संघटनेचे मुंबई अध्यक्ष संजय भैरे यांनी माने यांच्या वाढदिवसानिमित्त संगीत सकाळ आणि स्नेहभोजनाचाही कार्यक्रम आयोजित केला होता. त्यासाठी, मुंबईतील कामगार संघटनेचे नेते अभिजीत राणे, डिजिटल मिडिया संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य मयूर गलांडे, ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल वाघुले, सचिव यतीन पवार, मुंबई विभागातील पदाधिकारी,विविध संघटनांचे पदाधिकारी, स्थानिक पत्रकार आणि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्ष भैरे यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त करताना मानेंच्या पत्रकारितेतील प्रवासाचे आणि संघटनेच्या वाटचालीचे विशेष कौतुक केले.

# बाईनामा कथासंग्रहाचे प्रकाशन प्राचार्य रा.रं. बोराडे यांच्या हस्ते



**परतूर । प्रतिनिधी -** प्राचार्य रा.रं. बोराडे यांचे साहित्य आणि शिक्षण क्षेत्रात अनन्यसाधारण असे योगदान आहे. असंख्य लिहित्या लेखकांना दिशा आणि प्रेरणा देण्याचे काम त्यांनी सातत्यपूर्ण केले आहे. एखाद्या मोठ्या लेखकाचे पडसाद सर्व दूरपर्यंत कसे पडलेले असतात याची आठवण करून दिली आहे.

परतुर चे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. छबुराव भांडवलकर यांनी. ते म्हणतात माझ्या लिखाणाला दिशा देण्याचे काम बोराडे सरांच्या साहित्याने केले आहे. त्यांचे ऐकूण साहित्य वाचूनच आपणही लिहूशकतो हि मनोभूमिका तयार झाली त्यांच्या पाचोळा, चारापाणी ,मळणी,कनस, आणि कडबा, नातीगोती, बोळवण,मळरान आदी कथा , कादंबऱ्या वाचून मी भाराऊन गेलो होतो.एम.ए.मराठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झाल्यामुळे साहीत्य निर्मिती प्रक्रिया नेमकेपणाने समजली होती. शेतकरी कुटुंबाची पाश्वभूमी असल्यामुळे आपणही आपला भोवताल कथेच्या माध्यमातून वास्तवतेने मांडू शकतो.याची जाणिव झाली.पुढे बईनामा कथासंग्रह लिहून पूर्ण केला. प्रकाशनला कोणाला बोलवावे याचा मनी विचार चालू असताना अंतरिक मनाने सांगितले प्राचार्य रा.रं.बोराडे सर त्यावेळेस ते वैजापूरच्या महाविद्यालयात प्राचार्य होते. प्रा.अशोक देशमाने आणि मी त्यांना निमंत्रण देण्यासाठी गेलो होतो.

आनंदाने निमंत्रण स्वीकारून माझ्या पहिल्या कथासंग्रहाच्या प्रकाशनास आवर्जून परतूर शहरात आले. हे घटना आहे १९९१ ची. प्रकाशनाच्या कार्यक्रमाला तत्कालीन संस्थेचे अध्यक्ष आमदार स्व. वैजनाथ आकात, प्राचार्य रा.रं.बोराडे, ज्येष्ठ साहित्यिक स्व.नागनाथ कोत्तापल्ले, कैलास पब्लिकेशनचे के. एस. अतकरे, ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशिव, प्राचार्य द.रा. कुलकर्णी, आदी मान्यवर मंडळीची उपस्थिती होती. त्यावेळेस माझ्या कथासंग्रहाचे सर्वांनीच कौतुक करून काही सूचनाही केल्या. त्यावेळेस मी शाळेवर शिक्षक होतो. बोराडे सरांनी स्व. वैजनाथ आकात यांना सांगितलेकी,एम.ए.बी.एड. असलेले भांडवलकर यांचे लिखाण उत्तम आहे. त्यांना वरती संधी द्या. दुसऱ्याच दिवशी माझी शाळेवरून कनिष्ठ महाविद्यालयात बढती करण्यात आली. याचे सर्व श्रेय बोराडे यांना जाते. पहिल्याच कथासंग्रहाचे केले कौतुक आपल्या पहिल्या कथासंग्रहाच्या निमित्ताने परतुरचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. छबुराव भांडवलकरांनी बोराडे सरांच्या आठवणींना उजाळा दिला.

# पोलीस अधीक्षक, जालना यांच्या वतीने महाविद्यालयीन मुली व महिलांसाठी तीन दिवसीय स्वसंरक्षण शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** धरती जनसेवा प्रतिष्ठान रोहनवाडी जालना शैक्षणिक संकुलातील, डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय, ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, ओजस कॉलेज ऑफ फार्मसी, ओजस कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थिनींना आवश्यक आत्म-संरक्षण कौशल्यांसह सक्षम करण्यासाठी पोलीस अधिक्षक जालना यांनी तीन दिवसीय स्वसंरक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन केले होते. या शिबिरात स्व-संरक्षण तंत्र, वैयक्तिक सुरक्षेबाबत जागरूकता आणि सोशल मीडियाचा जबाबदार वापर यावर भर देण्यात आला.

शिबिरादरम्यान, तज्ञ प्रशिक्षक आणि पोलीस अधिकारी यांनी विविध स्व-संरक्षण तंत्रांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके प्रदान केली, ज्यामुळे सहभागींना गंभीर परिस्थितीत स्वतःचा बचाव करण्यास सक्षम केले. या सत्रांमध्ये सहभागींची शारीरिक आणि मानसिक तयारी वाढवण्यासाठी मूलभूत स्ट्राइकिंग तंत्रे, सुटका करून घेण्याच्या पद्धती आणि आत्मविश्वास वाढवण्याचे व्यायाम समाविष्ट करण्यात आले होते.

स्वसंरक्षण प्रशिक्षणासोबतच, पोलीस अधिकाऱ्यांनी सायबर सुरक्षा आणि सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची काळजी याबाबत जनजागृती सत्र आयोजित केले. त्यांनी सहभागींना त्यांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करण्यासाठी सायबर क्राईमच्या धमक्या, ऑनलाइन फसवणूक, स्टॅकिंग आणि सुरक्षित इंटरनेट पद्धतींबद्दल शिक्षित केले. अधिका-यांनी त्यांना ऑनलाइन छळाच्या बाबतीत उपलब्ध असलेल्या कायदेशीर कृतींबाबत मार्गदर्शन केले आणि कोणत्याही संशयास्पद हालचालींची तक्रार करण्यास प्रोत्साहित केले.

तिसऱ्या दिवशी शिबिराच्या समारोप प्रसंगी जालना जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल आणि अतिरिक्त पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची उपस्थिती होती. पोलीस अधीक्षकांनी आजच्या जगात स्वसंरक्षण आणि सायबर जनजागृतीचे महत्त्व पटवून देत जिल्ह्यातील




महिलांची सुरक्षा करण्यासाठी पोलीस दल नेहमी तत्पर असल्याची खात्री त्यांनी दिली. हा उपक्रम जालना पोलीस विभागाची महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेबाबतची वचनबद्धता दर्शवते. समाजातील महिलांचा आत्मविश्वास आणि तत्परता अधिक बळकट करण्यासाठी भविष्यातही असेच कार्यक्रम आयोजित केले जातील अशी ग्वाही त्यांनी दिली. शिबिरामध्ये उपस्थित असलेल्या विद्यार्थिनींना मा. अजयकुमार बन्सल आणि आयुष नोपाणी यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

शिबिराला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, त्यांनी मिळालेल्या मौल्यवान ज्ञान आणि कौशल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री भागवत शिंदे, प्राचार्या डॉ. मीनल ठोसर, प्राचार्य डॉ. कृष्णकुमार सिंह, प्राचार्य डॉ विठ्ठल कुचके,प्राचार्या डॉ. संगीता गायकवाड, प्राचार्या रमिता आर जे, प्रा. विजय जऱ्हाड, डॉ स्वाती नलिंदे, डॉ श्वेता धुमाळ, डॉ प्रतिभा मापारी,डॉ वैशाली मुळके, डॉ ज्योती सोसे, डॉ धनश्री शेळके, प्रा. निधी शर्मा, प्रा. सारिका दानवे, प्रा. स्मृतिगंधा कांबळे, प्रा. स्नेहल गायकवाड, नेहा खरात,अमृता लोखंडे, सारिका हिवराळे,प्रशंसा घोरपडे,शिक्षकेतर कर्मचारी आणि शैक्षणिक संकुलातील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शारदा गीते यांनी केले तर डॉ. सुप्रिया लोने यांनी आभार मानले.

# संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी

लीडकॉम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई अंतर्गत संत रोहिदास चर्मउद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित मुंबई महाराष्ट्र शासनाचा उपक्रम जिल्हा कार्यालय जालना येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.




जगाला मानवतेचा संदेश देणारे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेश व नंदाताई पवार यांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्साहाने जयंती साजरी केली. संत रविदास महाराजांचे विचार लोकांपर्यंत पोहोचतील अशी सर्वांनी या वेळेस प्रतिज्ञा केली या ठिकाणी गणेश चांदोडे , गवळी समाजाचे भरतानंद ( भक्त पहलवान ) , विजय ओमप्रकाश भगत , धरमचंद गरंडवाल , इरफान बागवान , अशोक लहाने , राजू अंबडकर ,करण कुमठे , सुनील कटारिया , काशिनाथ जाटवे , चंपालाल चरभरे , बाबूलाल कटारिया आदी समाज बांधवांची उपस्थिती होती व महामंडळाचे कर्मचारी दीपक अंभोरे व नयन पगारे यांच्यातर्फे अल्पहार देण्यात आलं.



**महाराष्ट्र राज्याचे महसूल गृह, व अन्न नागरी पुरवठा राज्यमंत्री ना. योगेश कदम जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता राज्यमंत्री आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या दर्शना बंगला येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी जिप अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, संतोष मोहिते आदी. (छाया - अनिल व्यवहारे)**

# संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त पीएमश्री प्रशालेत मोफत आरोग्य शिबिर



**मंठा । प्रतिनिधी -** संत सेवालाल महाराज यांच्या जयंतनिमित्त १५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, प्रशाला पाटोदा येथे मोफत आरोग्य शिबिर जीवन विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी करण्यात आली. प्रथमतः संत सेवालाल महाराज यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, गटसमन्वयक के.जी. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरात

संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व अजिंक्यतारा नर्सिंग होम येथील डॉ. सचिन सरकटे, डॉ. स्वराज बोराडे, डॉ. विशाखा जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या रक्तगट व हिमोग्लोबिनची तपासणी केली तर लॅब असिस्टंट गणेश यादव, जीवन काळे यांनी २५० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली.

याप्रसंगी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश टोम्पे, पुंडलिक यमलवाड, ज्योती कनकुटे, जयश्री डोंगरे, संग्राम तोगरे, नरसिंग सगरे, संजयकुमार ठाकूर, गंगाधर वानोळे, महानंदा गबाळे यांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# किनगाव राजाची लखन-दुर्गा ठरली रांजणी केसरीचे मानकरी

## बैलजोडी मालाकला सतीश घाटगेकडून मिळाली दुचाकी भेट



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात पहिल्यांदा समृद्धी साखर कारखान्यामार्फत सतीश घाटगे यांनी रांजणी येथे आयोजित भव्य बैलगाडा शर्यतीस बैलगाडा प्रेमींचा उदंड असा प्रतिसाद मिळाला. ही भव्य दिव्य स्पर्धा सर्वाना वेगळा आनंद देऊन गेली. सहभागी प्रत्येक धुरकरी आणि बैलगाडा मालकांनी प्रेक्षकांची मने जिकंली. या स्पर्धेतील विजेत्या बैलगाडा मालक व धुरकरी यांचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सन्मान करून बक्षीस वितरण करण्यात आले.

राज्यभरातील ११० नावाजलेल्या बैलजोडी या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. दोन दिवस ही स्पर्धा रंगातदार ठरली. ग्रामीण संकृतीचे दर्शन घडविणाऱ्या शंकरपटाचा थरार आणि रोमांचकारी शर्यतीचा आनंद या स्पर्धेमुळे बैलगाडा प्रेमींना अनुभवता आला. या स्पर्धेतील नंबर एकचे बक्षीस किनगाव राजा येथील लखन आणि दुर्गा या बैलजोडीने पटकावले. ५.८५ मिली सेकंदात या जोडीने मैदान सर करून आपल्या धन्यासाठी रांजणी केसरीचा मान पटकावला. त्यांना बक्षीस म्हणून समृद्धी कारखान्यामार्फत दुचाकी भेट देण्यात आली. तसेच दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस कानफोडी येथील महाराजातुफान या बैलजोडीने पटकावले तर तिसरे बक्षीस शंकरडायमंड या जोडीने मिळविले. दोन्ही बैलजोडी मालकांना स्कुटी बक्षीस देण्यात आली.

या स्पर्धेत खऱ्या अर्थाने घडीवाले रणजित राठोड यांनी रंगत आणली. आपल्या बहारदार समालोचनाने त्यांनी मने जिंकली सोबत स्पर्धेतील प्रत्येक बैलजोडीचा टायमिंग अचूकपणे टीपण्याचे काम त्यांनी केले. रांजणी येथील आफरोज भाई तांबोली मित्र मंडळ, अशफाक पठाण, आमेर कुरेशी, सलमान भैय्या तांबोली, शेख सलाम, बबलू तांबोली, रमेश मोरे, शाम लगामे, रोहीत दाभाडे, अतीक तांबोली यांचे उत्कृष्ट नियोजना बद्दल घाटगे साहेबांनी कौतुक केले.

# समाजकार्य महाविद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी रमेश गजर उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रत्नाकर बडदे व दत्ताराव काकडे हें उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. दीपक बुत्तरे,प्रा. डॉ. नरसिंग पवार, प्रा. डॉ.सुधीर गायकवाड, प्रा.डॉ.मीना बोर्डे, प्रा.डॉ. रेणुका बडवणे,जगन्नाथ मलवार, प्रकाश दांडगे,विष्णु भोसले, रामू एखण्डे, भीभीषन शेजूळ, संजय गोरे,पांडुरंग भुतेकर आदी उपस्थित होते.

# अश्विन राठोड यांची महसूल सहायकपदी निवडीबद्दल सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील दहिफळ तांडा येथील रहिवासी अश्विन रघुनाथ राठोड यांची मुंबई येथे एमपीएससी मधून महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल अश्विन राठोड यांचा सत्कार करण्यात आला.सत्कार करतांना दहिफळ येथील उपसरपंच गोपाल चौधरी.नारायण काळे. सिध्देश्वर शिंदे व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देऊळगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहंकार देऊळगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अहंकार देऊळगाव शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुकिंदा खरात हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच श्री गणेश विठोबा डोईफोडे , अरुण खरात, सुखदेव खरात, गोविंद खरात, अमोल खरात, गजानन खरात, गिरधारी गवई, राजू वाडेकर, कैलास सोमधाने , अशोक सोमधाने, सिद्धेश्वर डोईफोडे, ऋषिंदर डोईफोडे, राजू खरात, रंजीत खरात, जितेंद्र मुळे, सहदेव मस्के, कपिल मस्के, होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न, बोधिसत्व,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध हिंदी, मराठी गीतासह, देशभक्तीपर गीतावर नृत्य, मराठमोळी लावणी, नाटिका सादरीकरण, शिव भीम फुले गीतावर आधारित नृत्य विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. उपस्थित महिलांनी पुरुषांनी टाळ्या वाजवून मुलांचा उत्साह वाढवण्याचा प्रयत्न केला. एका पेक्षा एक सरस नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. गावातील दिल्ली येथे कार्यरत असलेले सुपुत्र उद्धव मुळे यांनी त्यांच्या आईच्या स्मृती प्रित्यर्थ शाळेला कायमस्वरूपी सांस्कृतिक स्टेजची निर्मिती करून दिली. गावाचे सरपंच श्री. गणेश विठोबा डोईफोडे यांनी या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी डेकोरेशन व साऊंड सिस्टिम ची व्यवस्था करण्यासाठी पाच हजार रुपये शाळेला देणगी म्हणून दिले.

## प्रदेश अध्यक्ष बावनकुळेंच्या उपस्थित सतीश घाटगे यांचा भाजपात प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीत जनता व कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अपक्ष निवडनुक लढविणारे समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी पुन्हा एकदा भाजपात प्रवेश केला आहे. शनिवारी महसूल मंत्री तथा भाजपचे कार्यकारी अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व प्रभारी प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, संजयजी केणेकर, मंत्री अतुल सावे, आमदार विक्रांत पाटील, आमदार अनुराधा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

घनसावंगी विधानसभेतील जनतेचे प्रश्न भारतीय जनता पक्षच सोडवू शकतो म्हणून घनसावंगीच्या प्रगतीसाठी आणि विकासात योगदान देण्यासाठी मी पुन्हा भारतीय जनता पार्टीत राहण्याचा निर्णय घेतल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. चंद्रशेखर बावनकुळे व रवींद्र चव्हाण आणि रावसाहेब पाटील दानवे यांनी त्यांचे पक्षात पुन्हा स्वागत करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सतीश घाटगे यांनी पुन्हा भाजपात प्रवेश केल्यामुळे घनसावंगी विधानसभेतील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून कार्यकर्त्यामध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

## कुंभक्षेत्री लावण्यात आलेल्या महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या प्रदर्शन कक्षाला १० हजारांहून अधिक भाविकांनी दिली भेट






**प्रयागराज । प्रतिनिधी -** महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाकडून कुंभक्षेत्री सेक्टर ७ येथे प्रदर्शनकक्ष लावण्यात आला आहे. या प्रदर्शन कक्षाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून ११ फेब्रुवारीपर्यंत १० हजारांहून अधिक भाविकांनी कक्षाला भेट दिली. साधू-संतांसह वैद्यक, शिक्षण, विज्ञान, प्रशासन आदी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या उच्चपदस्थ मान्यवरांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले.

या प्रसंगी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स'चे के.के. सिंह, 'इस्रो'च्या निवृत्त वैज्ञानिक डॉ. नलिनी सतीश, उत्तर-मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक शरत चंद्रायन् यांच्यासह अनेक मान्यवरांनी संपूर्ण प्रदर्शन पाहिले आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'राष्ट्रीय विद्यार्थी सेने'चा भाग असलेल्या उत्तरप्रदेशमधील 'भारत स्काऊट अँड गाईड'च्या विद्यार्थ्यांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाकडून देण्यात येणार्या 'व्यक्तीमत्त्व विकास आणि तणाव नियंत्रण', या विषयावरील मार्गदर्शनाचा लाभ घेला. उत्तरप्रदेश, हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरांचल अशा अनेक राज्यांतून, तसेच न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोप अशा अनेक देशांतून आलेल्या भाविकांनीही अध्यात्मविषयीच्या वैज्ञानिक परीक्षणांविषयीची माहिती जिज्ञासेने जाणून घेतली. अनेक जिज्ञासूंनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाकडून आयोजित केल्या जाणार्या ५ दिवसीय कार्यशाळेत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. या प्रदर्शनात दिली जाणारी अध्यात्मशास्त्रीय माहिती आणि त्यासमवेतच वैज्ञानिक आधार लोकांना भावला. अनेक भाविकांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालच्या कार्याशी जोडण्याची इच्छा व्यक्त केली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.